आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, १६ मार्च २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : २१ । पाने : ४ । मूल्य २ ₹

### एमपीएससी परिक्षा २१ मार्चला होणार


मुंबई : एमपीएससी परीक्षांबाबत दि.११ मार्चला घेण्यात आलेल्या निर्णयाविरोधात परीक्षार्थीकडून राज्यभर आंदोलन करण्यात आल्यानंतर अखेर २१ मार्चला होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे राज्यसेवा पूर्वपरीक्षा २१ मार्चला होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २७ मार्चलाच होणार आहे.

# 'ते' एक हजार कोटी गेले कुठे?

## आमदार प्रकाश सोळंके यांचा विधानसभेत सवाल; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातील महाघोटाळा

▶ विशेष प्रतिनिधी

मुंबई : भाजपा सरकारच्या काळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात महाघोटाळा झालेला असून अधिकृत संकेतस्थळावर आणि प्रत्यक्ष केलेला दावा या आकडेवारीवरीत मोठी तफावत आहे, त्यामुळे ते १००० कोटी गेले कुठे? असा थेट सवाल विधानसभेत माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी बुधवारी उपस्थित केला. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी व्हावी अशी मागणी आमदार सोळंके यांनी लावून धरली आहे.



अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा बुधवारी समारोप झाला. यावेळी विधानसभेत चर्चेच्या वेळी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात सन ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०१९ या कालावधीत निधी वाटपात मोठा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. तत्कालीन कक्षप्रमुखांनी १५०० कोटी रूपये २१ लाख रूग्णांवर खर्च केले असल्याचा दावा केला आहे. प्रत्यक्षात मात्र अधिकृत संकेतस्थळाच्या दाव्यानुसार ५४ हजार रूग्णांवर ५२६ कोटी रूपये खर्च झाल्याचे नमूद आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात महाघोटाळा झाल्याचे दिसून येते, यातील गंभीर बाब म्हणजे मृत व्यक्तींच्या नावेही निधी उचलला असल्याच्या तक्रारी राज्यभरातून आलेल्या आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात त्यावेळी दलाल आणि एजंटांची साखळी राज्यभर निर्माण झाली होती. काही खाजगी हॉस्पीटलशी संधान साधून अपात्र रूग्णांच्या नावेही गैरव्यवहार केलेल्या असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करावी, अशी मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी विधानसभेत केली आहे.

### 'सिंचन महामंडळ उभारण्याची गरज'

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेला अर्थसंकल्प सर्वांचे हीत साधणारा आहे. आरोग्य सुविधा मिळवण्यासाठी मोठी आर्थिक तरतूद केली आहे. मात्र सरकारने किडनीच्या आजारावर डायलिसिस सेंटरची सुविधा तालुकास्तरावर उभारावी अशी मागणीही आमदार प्रकाश सोळंके यांनी विधानसभेत केली. मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी प्रसंगी बाहेरून पाणी वळविण्याची गरज आहे. त्यासाठी वेगळे सिंचन महामंडळ तयार करावे असेही आमदार प्रकाश सोळंके म्हणाले.




## फास्टट्रॅकन्यूज



### ऊस गाळपात आता अडथळा येऊ देणार नाही : पंकजा मुंडे

परळी : वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरळीत चालू झाला आहे. शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस गाळप करू, यात कसलाही अडथळा आता येऊ देणार नाहीत असा शब्द देत कर्मचारी युनियनने कारखान्याच्या अध्यक्षा पंकजा मुंडे यांच्यावर आपला ठाम विश्वास व्यक्त केला आहे.यासंदर्भात वैद्यनाथ कारखाना कर्मचारी युनियनचे अध्यक्ष विष्णु तांबडे व उपाध्यक्ष बालासाहेब मुंडे यांनी कारखाना प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, आम्ही, सर्व वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना युनियन हे स्पष्ट करू इच्छितो की, आमची कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या ॲडव्हान्स बद्दल कारखान्याच्या मॅनेजमेन्टशी चर्चा चालू होती. ही चर्चा सकारात्मक वळण घेत असतांना काही लोकांनी यामध्ये हस्तक्षेप व मुजोरी करून कारखाना बंद पाडला आणि यामुळे बाहेर मिडियामध्ये बातमी पसरली.

### यंदाची नीट परिक्षा १ ऑगस्टला होणार

दिल्ली : मेडिकल प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या 'नीट -२०२१' च्या परीक्षेची तारीख जाहीर झाली आहे. परीक्षा यंदा १ ऑगस्टला होणार आहे. मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांत एमबीबीएस आणि बीडीएस कोर्सच्या पात्रतेसाठी नीट परीक्षा घेतली जाते. NEET (UG) 2021 MBBS, BDS, BAMS, BSMS, BUMS आणि BHMS या अभ्यासक्रमासाठी ही परीक्षा घेण्यात येणार आहे. इंग्रजी हिंदीसह ११ भाषेत ही परीक्षा घेण्यात येणार आहे. १ ऑगस्टला ऑफलाईन परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

### आता ३० दिवसांत मिळणार ऑल इंडिया परमिट

दिल्ली : केंद्र सरकाराने टूरिजमला प्रोत्साहन देण्यासाठी ऑल इंडिया टूरिस्ट परमिटसाठी आता ऑनलाईन अर्ज केल्यानंतर ३० दिवसांत परमिट मिळेल, अशी माहिती दिली आहे. हा नियम १ एप्रिल २०२१ पासून लागू होणार आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या योजनेची घोषणा केली आहे. ज्याअंतर्गत कोणताही पर्यटक वाहन ऑपरेटर ऑनलाईनद्वारे ऑल इंडिया टूरिस्ट ऑथरायजेशन/ परमिटसाठी अर्ज करू शकतो. हा नियम संबंधित कागदपत्र जमा केल्यानंतर आणि फिस भरल्यानंतर जारी केला जाईल. यासाठीची कागदपत्र जमा करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.



# लॉकडाऊन करण्यास भाग पाडू नका

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा खणखणीत इशारा

▶ प्रतिनिधी

मुंबई : गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून आपण सर्व व्यवहार सुरु केले आणि त्यानंतर सुमारे ४ महिने आपण सर्वांनी एकजुटीने संसर्ग रोखला पण आता मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी आणि नियम न पाळल्याने संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अजूनही परिस्थिती नियंत्रणात असून हॉटेल व उपाहारगृहांनी नियमांचे पालन करावे, कडक लॉकडाऊन करण्यास भाग पडू नये, हा शेवटचा इशारा आहे असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

आहार, नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन, शॉपिंग सेन्टर्स असोसिएशन यांच्या प्रतिनिधींशी दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन संवाद साधला व सहकार्याचे आवाहन केले. यावेळी मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, पालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर, टास्क फोर्सचे डॉ.शशांक जोशी, डॉ.तात्याराव लहाने, अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी उपस्थित होते.

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, गेल्या ४ महिन्यात सर्व व्यवस्थित होत होते. आपल्याच राज्यात नव्हे तर अगदी युरोपमध्ये सुद्धा जणू काही कोरोना गेल्यासारखं सर्व व्यवहार मोकळेपणाने सुरु झाले होते. मात्र अचानक सर्वत्रच संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत असून तिकडे ब्राझीलमध्ये भयानक स्थिती झाली आहे. आपल्याला युरोपसारखी परिस्थिती होऊ द्यायची नसेल तर काटेकोरपणे आरोग्याचे नियम पाळावे लागतील.

### स्वयंशिस्त खूप महत्वाची

पुढच्या काळात देखील आपल्याला कोविडबरोबरच जगायचे असून जीवनपद्धती त्याला अनुरूप करावी लागेल. बंदी आणि स्वयंशिस्त यात फरक असून सर्वांनी याचे भान ठेवावे असेही ते म्हणाले. मागील वर्षी विशेषत्वाने झोपडपट्टीत मोठ्या प्रमाणावर संसर्ग दिसू लागला होता. यावेळी मात्र तो इमारती, बंगले, सोसायट्यांमध्ये दिसतो आहे. याचे कारण म्हणजे समाजातील या वर्गाचे गेल्या काही दिवसांपासून एकमेकांना भेटणे, हॉटेलिंग, मॉल्समध्ये जाणे सुरु झाले आहे, त्यामुळे परीवारांतल्या सर्व सदस्यांत एकदम फैलाव होत आहे.

मागील आठवड्यात केंद्रीय पथक मुंबईत आले असता एका हॉटेलमध्ये त्यांना कोणत्याही कर्मचाऱ्यांनी मास्क न घातलेला व सुरक्षित अंतर न पाळता गर्दी झाल्याचा अनुभव त्यांनी आपणास सांगितला होता. हॉटेल्स आणि उपाहारगृहे हे भेटीगाठी व जेवण-नाश्त्याचे प्रमुख ठिकाण असून सुरुवातीच्या काळात नियमांचे पालन होताना दिसत होते. हॉटेल्समध्ये समोरासमोर न बसवता सुरक्षित अंतर ठेऊन बसविणे, वेटर्सआणि इतर कर्मचारी यांनी मास्क घालणे, जंतुनाशक फवारणी असे होत होते. पण राज्यभरात आता काही हॉटेल्स , मॉल्स, उपाहारगृहांत नियमांची पायमल्ली होऊन वातावरण सैल झाल्यासारखे प्रशासनाला दिसत आहे. अजूनही परिस्थिती आपल्या हातात आहे, आपण स्वत:हून आमच्या एसओपीचे पालन नीट व काटेकोरपणे झालेच पाहिजे हे पहा. सर्व जन नियम धुडकावत आहेत असे नाही, पण काही नियम न पाळणाऱ्यांमुळे धोका वाढतोय असेही ते म्हणाले. लॉकडाऊन लावून सगळे बंद करणे आम्हाला सुद्धा आवडत नाही. आपण हे अर्थचक्र सुरु केले आहे, सर्वांनी सहकार्य केले तर संसर्ग रोखता येईल त्यामुळे लॉकडाऊनसारखे कडक निर्बंध लावण्यास भाग पडू नका असेही मुख्यमंत्री म्हणाले.



### नियम तोडत असतील तर कारवाई करा

पालिका आणि पोलीस प्रशासनाने देखील यासंदर्भात राज्यातील सर्व हॉटेल्स व उपाहारगृहे काटेकोर पालन करतात किंवा नाही तसेच नियम तोडत असतील तर कारवाई करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी देखील सांगितले की, एकीकडे आम्हाला कोरोनाला पूर्णपणे रोखायचे आहे पण असे करतांना अर्थचक्रही सुरूच ठेवायचे आहे. हे संतुलन राखण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची खूप गरज आहे. १ फेब्रुवारी पासून कोरोना वाढतोय . आज सुमारे १५००० रुग्ण दिवसाला सापडले आहेत तर १ लाख १० हजार सक्रीय रुग्ण राज्यात झाले आहेत. या वेगाने १५ एप्रिलपर्यत २५ हजार रुग्ण दिवसाला आढळतील, त्यामुळे गर्दीचे नियंत्रण ठेवणे व सुरक्षित अंतर राखणे गरजेचे आहे हे सांगताना त्यांनी सिद्धीविनायक मंदिरात तंत्रज्ञांच्या उपयोगाने गर्दीचे कसे व्यवस्थापन केले आहे त्याचे उदाहरण दिले.

पालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी यावेळी सुचना केली, की हॉटेल्स संघटनांनी प्रत्येक प्रभागात त्यांची फिरती पथके तयार करून नियमांचे पालन होते आहे किंवा नाही ते तपासावे. सर्व पदाधिकाऱ्यांची तत्काळ बैठक घेऊन त्यांना जाणीव करून द्यावी. एक स्टार किंवा दोन स्टार तसेच लहान उपाहारगृहांत नियम पाळत नसल्याचे दिसून येते असेही ते म्हणाले.

याप्रसंगी हॉटेल्स आणि उपाहारगृहे यांच्या संघटनांच्या वतीने गुरुबक्षसिंग कोहली ,सुभाष रुणवाल, शिवानंद शेट्टी, श्री रहेजा आदींनी शासनाला संपूर्ण सहकार्य करण्याचे तसेच प्रसंगी एसओपी न पाळणाऱ्या उपाहारगृहांना संघटनेतून काढून टाकण्याची कार्यवाही केली जाईल असे आश्वस्त केले. मॉल्समध्ये ४० ते ५० हजार लोक दररोज येतात, तेथे देखील कोविड मार्शल्स मास्क न घालणाऱ्याना दंड करतील व फूड कोर्टमध्ये देखील संख्या मर्यादित ठेवूत, थर्मल इमेजिंग, संपर्काशिवाय पार्किंग याचे देखील पालन केले जाईल असे संघटनांनी सांगितले.

# रूग्ण कमी होताच बंधने हटवणार

## जिल्हाधिकाऱ्यांचे अनिल जगताप यांना आश्वासन

▶ प्रतिनिधी

बीड : बीड जिल्ह्यात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी व्यावसायिक बंधने घातली, व्यापाऱ्यांकडून या बंधनाचा निषेध होत होता, या संदर्भात शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी आज जिल्हाधिकारी रविंद्रजी जगताप यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. रूग्ण संख्या कमी होताच बंधने हटवली जातील असे आश्वासन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आले.

व्यावसायिक, मजुर व हातावर पोट असणाऱ्यांवर आज उपासमारीची वेळ आली. मागच्या महिन्यात कोरोना विषाणू चा वाढता प्रादुर्भाव रूग्ण संख्या वाढवत आहे. याच कारणावरून जिल्हप्रशासनास अंशतः बंधने घालावी लागली. मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे ही या विषयी गंभीर आहेत. प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणे हाच एकमेव पर्याय असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले. रूग्ण संख्येचा वाढता आलेख कमी झाला तर बंधने शिथील होतील असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी शिवसेनेचे मा तालुकाप्रमुख उल्हास गिराम, युवासेनेचे जिल्हाप्रमुख अभिजीत बरीदे, पंकज कुटे, मुकेश शेवगण, चंद्रशेखर कवडे, आप्पासाहेब शेळके, चंद्रसेन काळे आदि उपस्थित होते.





### जिल्ह्याचा आकडा पुन्हा अडीचशेच्या घरात

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यातील अडीच हजाराच्या आसपास रुग्णांची तपासणी केली असता त्यात २४८ रूग्ण पॉझिटिव्ह आढळून आले. सलग तिसऱ्या चौथ्या दिवशी बीड शहर अन तालुक्याचा आकडा शंभर पार गेला आहे.

बीड जिल्ह्यात सोमवारी प्राप्त झालेल्या अहवालात वडवणी ३, शिरूर ३, पाटोदा ५, परळी ६, माजलगाव २७, केज ११, गेवराई १५, धारूर ४, बीड ११५, आष्टी ९ आणि अंबाजोगाई मध्ये ५० अशाप्रकारे पॉझिटिव्ह रुग्ण सापडले आहेत. बीड जिल्ह्यात प्रशासनाने रात्री सात पासून सकाळी सातपर्यत नाईट कर्फ्यू लावलेला आहे.

# नित्रुड ग्रामपंचायतीवर २५ वर्षे लालबावटा

## कॉ.दत्ता डाके यांचा आजही 'करिश्मा' कायम

▶ बाबा श्रीहरी देशमाने

माजलगाव : तालुक्यातील नित्रुड ग्रामपंचायतीवर मागील ५ वर्षे अपवाद वगळता २५ वर्षे लालबावट्याची सत्ता असून 'माकप'चे ज्येष्ठ नेते कॉ.दत्ता डाके यांचा आजही 'करिश्मा' कायम आहे. त्यांच्या गळ्यात तिसऱ्यांदा सरपंचपदाची माळ पडली आहे, हा डाव्या विचारांचा विजय असल्याची प्रतिक्रिया 'वर्तमान'शी बोलताना डाके यांनी दिली.



सन १९८० पासून कॉ.दत्ता डाके अगदी विद्यार्थी दशेपासून डाव्या विचारसरणीशी जोडलेले आहेत. बीड जिल्ह्याचे माजी खासदार कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या विचाराने प्रभावित होऊन ॲड.मोतीराम दराडे यांच्या नेतृत्वाखाली कॉ.दत्ता डाके मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात आले ते आजतागायत खांद्यावर लालबावटा घेऊन कार्यरत आहेत.

सलग २५ वर्षे ग्रामपंचायतीवर लालबावट्याची सत्ता प्रस्थापित करणारे कॉ.डाके आजही तितकेच लोकप्रिय आहेत. १९९५ ते २००५ या कालावधीत ते सरपंच राहिले. त्यानंतर नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत पॅनल निवडून आणून ते तिसऱ्यांदा नित्रुडचे सरपंचपद भूषवित आहेत. ११ वर्षे नित्रुड सेवा सोसायटीचे चेअरमन म्हणूनही त्यांची कारकीर्द अत्यंत प्रभावी राहिलेली आहे.



### विधानसभाही लढविली

कॉ.दत्ता डाके मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते असून माजलगाव विधानसभा मतदारसंघात त्यांची चांगली पकड आहे. त्यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि थेट विधानसभा निवडणुकही लढविली आहे. सध्याचे राजकारण भांडवली असून तत्त्वांचे राजकारण दुरापास्त झाले आहे. अशा काळात जगाला मानवतावाद शिकवणारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षच तारू शकतो, असे कॉ.दत्ता डाके सांगतात.

## संपादकीय

# कस्टमर ईज किंग

ग्राहक चळवळीबद्दल काळानुरूप जागरूक राहणे आवश्यक आहे. तरच ग्राहक राजाचे हीत जपले जाईल. ग्राहक दिन दरवर्षीच साजरा होतो. पण त्यात औपचारिकता आली आहे. त्यातून काही साध्य होईल अशी परिस्थिती वाटत नाही. त्यानंतरच्या येणाऱ्या प्रतिक्रिया-सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून बघितल्या जात नाहीत किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. सुधारणा होत नाही. सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे, जाहिरातीचाही आहे, जो तो आपला उत्पादित माल बाजारपेठेत कसा जास्त विक्री होईल, या प्रयत्नात असतो. कस्टमर ईज किंग (ग्राहक राजा आहे) किंवा कस्टमर ईज गॉड (ग्राहक देव आहे) अशी विशेषणे ग्राहकाला लावली जातात आणि दुसरीकडे अनेक प्रलोभने दाखवून ग्राहकांना आपल्या मालाचे, वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते आणि जाळ्यात ओढले जाते आणि बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी पडतो. त्यातच त्याची फसवणूक केली जाते. पॅन्टवर शर्ट मिळणार अगदी फुकट. साडीवर साडी मिळणार अगदी फुकट. बाय वन गेट वन, एक वस्तू खरेदी केली, तर एक फुकट, तर कधी विशिष्ट रकमेचा माल खरेदी केला तर कुपन मिळेल, त्याची सोडत निघणार, त्यात हमखास बक्षीस मिळणारच. सोने खरेदीवर चांदीचे नाणे किंवा गिफ्ट मिळणार, फ्लॅट खरेदीवर टू व्हीलर मिळवा, अशा जाहिराती मोठ्या प्रमाणावर केल्या जातात आणि त्यालाच तुम्ही-आम्ही भुलतो आणि फसवणूक होते. ग्राहक दिन साजरा करण्यामागचा उद्देश बघितला, तर ग्राहकाची फसवणूक होऊ नये, सेवा पुरवताना हलगर्जीपणा होऊ नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहिती करून द्यावी हाच मूळ उद्देश आहे. १९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला होता. अध्यक्ष केनेडी यांनी ग्राहकांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केले. जागतिक पातळीवर पाठपुरावा केला गेला, त्याला युनेस्कोकडून मान्यता मिळाली आणि तद्नंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे. सर्वत्र तो साजरा केला जातो. आपल्या देशात १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली. तेव्हापासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. नवीन ग्रा. सं.कायदा जुलै २०२० मध्ये लागू झाला. ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकास सहा प्रकारचे हक्क प्राप्त झाले आहेत. यात १) सुरक्षेचा हक्क, २) माहितीचा हक्क, ३) निवड करण्याचा हक्क, ४) म्हणणं मांडण्याचा हक्क, ५) तक्रार करण्याचा, तसेच तिचे निवारण्यासाठीचा हक्क, ६) ग्राहकांच्या हक्काविषयी शिक्षणाचा अधिकाराचा समावेश आहे. ग्राहकांना हक्क कर्तव्ये माहिती नसल्यामुळे बाजारपेठेत फसवणूक होते, ते समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाकडून जागो ग्राहक जागोसारखे उपक्रमाद्वारे प्रबोधन केले जाते. ग्राहकांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक मंच कार्यरत आहेत. विनाशुल्क आपण तक्रार दाखल करू शकतो. राज्यपातळीवर राज्य ग्राहक परिषद आहे, तर केंद्रात राष्ट्रीय परिषद आहे. गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत, प्रवासी संघ, कार्यान्वित आहेत. ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे. या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते. शासकीय सदस्य व अशासकीय सदस्य असतात. काही वर्षापासून शासनात ग्राहक संरक्षण विभागाची निर्मिती केली आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे मंत्र्याची नेमणूक आहे.

न्याय मिळवून देण्यासाठी व्यवस्था असली तरी ग्राहकास खूप काळ न्यायासाठी ताटकळत बसावे लागते. ग्राहकांच्या वाढत्या फसवणुकीचे प्रकाराला आळा बसावा म्हणून केन्द्र सरकारने जागो ग्राहक जागो अभियान सुरू केले आहे. बँका, सार्वजनिक वितरण, वीज, बांधकाम, अन्नौषध, पर्यटन, पोस्ट अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी अभियानाच्या हेल्पलाइनवर ग्राहक करू शकतो. जागतिक ग्राहक दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकीय पातळीवरून आयोजन केले जाते. काहीच ठिकाणचे अपवाद सोडले, तर बहुतांशी उदासीनता असते. कार्यक्रमासंबंधित प्रसार, प्रचार व्हावा तो होत नाही. अशा कार्यक्रमास ग्राहकांच्या उपस्थितीचा अभाव असतो. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्तधान्य दुकानदार हेच उपस्थित असतात. वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गॅस एजन्सी, वजनमापांबाबत अधिकारी उपस्थिती हवी. ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजवून सांगायला हवा, ते होत नाही. कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती वाढण्यासाठी प्रयत्न होत नाही. सालाबादप्रमाणे कार्यक्रम साजरा करून, वर्तमानपत्रात वृत्त प्रसिद्ध होते. यापलीकडे काही साध्य होत नाही. शासनाने याबाबतीत योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे हे मात्र नक्कीच. शेवटी एकच म्हणावे लागेल. कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत. ग्राहक म्हणून त्याचा कसा वापर करायचा ते आपणच ठरवायचे आहे. कारण ग्राहक शक्ती + न्याय शक्ती + दंड शक्ती = शोषण मुक्ती हेच समीकरण आहे. याबाबत व्यापक जनजागृती होणे काळाची गरज आहे.

# शब्द पाळणारा नेता

### उसतोड्या भावांनो धनुभाऊंनी दिलेला शब्द पाळला बरका; तुमचं कल्याण होवो!



**विशेष**
**सुधीर सांगळे**

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले, ही म्हण अनेक वर्ष प्रचलित आहे, पण प्रत्यक्षात ती आचरण्यात आणायची वेळ सामान्य माणसावर फार कमी वेळा येते हा अनुभव आहे. पण आता ही म्हण राज्यातल्या लाखो ऊसतोडणी करणाऱ्या कामगार बंधू भगिनीना लागू पडणार आहे. त्याचं कारणही तसंच आहे. राज्यात हजारावर जिवंत सहकारी व खाजगी साखर कारखाने आहेत. ते लाखो मेट्रिक टन ऊस दरवर्षी गाळप करतात. अत्यंत दुष्काळाच्या काळात महिना-दोन महिने का असेना पण क्षेत्रातल्या उसाचे शंभर टक्के गाळप करणारे कारखाने देखील महाराष्ट्रात आहेत. याच महाराष्ट्रात एकेकाळी आशिया खंडात नावाजलेले व सध्या योग्य मॅनेजमेंट अभावी अगदी शेकडो कोटींचे नुकसान भोगत कसेबसे शासन दयेने चालणारे कारखाने देखील या राज्यात आहेत. या सर्व कारखान्यांमध्ये गाळप केल्या जाणाऱ्या लाखो मेट्रिक टन उसाच्या गाळप व साखर उद्योगामागे यशस्वी व कष्टकरी हात आहेत राज्यातील लाखो ऊसतोड कामगार बांधवांचे. या ऊसतोड कामगार बांधवांच्या काबाड कष्टाला टनामागे कवडीमोल दाम देऊन कारखानदार आपल्या तुंबड्या भरतात, आज त्या श्रीमंतजीवी कारखानदारीला आणि श्रमजीवी ऊसतोड कामगाराला न्याय देण्यासाठी आजपर्यंतचे सर्वात मोठे, धाडसी व सकारात्मक पाऊल धनु भाऊच्या सामाजिक न्याय विभागाने अजित दादांच्या मदतीने उचलले आहे.

मूळ विषयापासून पुन्हा अभ्यास करू...

राज्यात बीड सह जवळपास १५ जिल्ह्यातून १४ ते १५ लाख असंघटित कामगार आपल्या बिऱ्हाडासह ऊस तोडणी व वाहतुकीच्या कामाला जातात. उसाच्या बुडावर कोयत्याने सपासप वार करून, तोडलेल्या उसाला डोक्या-खांद्यावरून वाहत वाहनात भरून तो कारखान्यावर पोचवण्याचे काम ऊसतोड कामगार व वाहतूकदार करतात. त्याबदल्यात त्यांना उसाच्या टनामागे शे-दोनशे रुपये मिळतात. या कामगारांना पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ अशा ठिकाणी ७-८ महिने स्थलांतरित होऊन तात्पुरत्या स्वरूपात संसार उभा करावा लागतो. सोबत त्यांची लहान सहान लेकरं देखील उसाच्या त्याच फडात पाचटी सोबत खेळ खेळून आपले भविष्य रंगवत असतात. उसतोडणीला जाणाऱ्या २० ते ३०% महिलांना गर्भाशय, मूत्रपिंड, पोटाचे विकार असल्याचे एका संस्थेच्या अहवालात नुकतेच स्पष्ट झाले आहे. स्वतःच्या गावात स्वस्त मिळणारे धान्य, सततच्या स्थलांतरामुळे त्यांना महाग विकत घेऊन खावे लागते, गावातून जाताना सोबत ओझं नेणार तरी किती? ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांच्या लेकरांच्या शिक्षणात दोन-तीन वर्षाचे गॅप पडतात, मुलींना तर शाळेतच घातले जात नाही, गरिबी आणि असुरक्षिततेची भावना म्हणून पोरींना अगदी १३-१४ च्या वयापासूनच भाजले जाते! (ग्रामीण भागात भाजने अर्थात झटपट लग्न करून टाकणे होय!) या आणि अश्या कित्येक समस्या हे ऊसतोड कामगार आपल्या नशिबी घेऊन वर्षानुवर्षे कोयत्याने ऊस तोडून आपली साखर गोड करण्याच्या नादात स्वतःच्या आयुष्यातील अंधार सहन करत आले आहेत. स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे नेतृत्व ९० च्या दशकात बहरले गेले, त्यांनी या गोरगरीब कष्टकरी वर्गासाठी, यांना न्याय मिळवून देण्यासाठी या कोयत्याचं नेतृत्व करायचं ठरवलं. अगदी ऊसाच्या फडात प्रत्यक्ष रात्री काढून त्यांनी या वर्गाच्या समस्या जाणून घेतल्या. स्व.गोपीनाथरावांनी या उसतोडयांना त्यांच्या मेहनतीचा योग्य दाम मिळावा यासाठी मोठा लढा उभारला. त्यात त्यांना अनेकांची साथ मिळाली आणि त्यातूनच तीन-तीन वर्षाचा करार साखर संघासोबत करून दर तीन वर्षानी उसतोडयांना भाव वाढ करून देण्याची पद्धत प्रचलित झाली. यात स्व. मुंडे साहेब व शरद पवार साहेब या परस्पर विरोधी जोडगोळीचा सिंहाचा वाटा होता.

विखे पाटील अपघात विमा योजना, साखर शाळा यांसारखे काही प्रयोग त्या-त्या काळातील राज्यकर्त्यांनी राबवले मात्र या योजनांना नाममात्र यश मिळाले. साखर शाळा तर पूर्णपणे बंद पडल्या. अनेक कारखानदार लोकांना तसेच ऊसतोड कामगार संघटनेच्या नेत्यांना विखे पाटील विमा योजना नेमकी काय हे सुद्धा माहीत नाही, तर तिच्या यशाचे मूल्यमापन न केलेलेच बरे! पुढील काळात माजी मंत्री पंकजाताई मुंडे, आ.सुरेश धस, प्रा.सुशिलाताई मोराळे, प्रतापराव ढाकणे अशा काही नेते मंडळींनी या कोयत्याचे नेतृत्व करण्याचा दावा केला, परंतु प्रत्यक्षात फक्त लाखो लोकांचे मेळावे आणि मीच तुमचा नेता हे मान्य करायला लावण्याखेरीज यांपैकी कोणालाही या उसतोडयांसाठी काहीही ठोस करता आले नाही. उलट भाववाढीचा तीन वर्षानी होणारा करार ५ वर्षाचा करून ठेवला आणि जाणकारांचा रोष ओढवून घेतला!स्व.मुंडे साहेबांच्या अकाली निधनानंतर पोरक्या झालेल्या या ऊसतोड कामगारांच्या तोंडाला मागील काळातील भाजप सरकारने अक्षरशः महामंडळाच्या नावाने पाने पुसली! पाच वर्षाच्या सत्ताकाळात स्व. मुंडे साहेबांच्या नावाने घोषित करण्यात आलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ दोनदा सुरू व तीनदा बंद करण्यात आले. पाच वर्षानी सत्ता गेली पण या महामंडळाचे कार्यालय कुठे होते हे शोधण्यात संशोधकांना सुद्धा यश आलं नाही. बरं भाववाढ तर साखर संघ ठरवतो मग हे महामंडळ कशासाठी? हा प्रश्न अनेकांना पडतो; त्याचं उत्तर असं आहे की लाखांच्या संख्येत असलेले हे कामगार असंघटित आहेत, त्यांची शासन दरबारी कुठंही नोंद नाही, ऊस तोडताना कोयता हाता-पायावर लागला तर त्याला स्व खर्चाने इलाज करण्याखेरिज पर्याय नाही, शारीरिक किंवा मानसिक छळ झाला तर दाद मागावी असं एकही दार नाही, ना कोणता विमा ना कोणते संरक्षण ना कोणता कायदा! अशी ससेहोलपट या कामगारांची आहे.

महाराष्ट्र हे राज्य ऊस उत्पादनात देशात दुसऱ्या स्थानावर आहे, आणि या साखरेला गोड करणाऱ्या या कामगारांची इतकी वाईट अवस्था? राज्यात अस्तित्वात असलेल्या कामगार कायद्याप्रमाणे ऊसतोड कामगारांसाठी विशेष कायदा अतित्वात यावा, त्यासाठी त्यांची नोंदणी, त्यांना विमा, त्यांच्या मुलांचे शिक्षण, महिलांचे आरोग्य व सुरक्षा अशा भिन्न योजना राबविल्या जाव्यात यासाठी स्वतंत्र यंत्रणा शासन स्तरावर अस्तित्वात असणं गरजेचं आहे, म्हणून हे महामंडळ!डिसेंबर २०१९ मध्ये चमत्कार स्वरूपात अस्तित्वात आलेल्या महाविकास आघाडी सरकारमध्ये धनंजय मुंडे यांची राज्याच्या सामाजिक न्याय मंत्री पदी वर्णी लागली, पद्ग्रहण केले त्याचदिवशी त्यांनी ऊसतोड कामगारांसाठी काहीतरी चांगलं करून दाखविण्याचा मानस व्यक्त केला होता. त्यानुसार कामाला लागले आणि कामगार व सहकार खात्यात विभागून दिलेला ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचा विषय त्यांनी अजित दादांना साकडं घालून सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करून घेतला!

धनंजय मुंडे ऊसतोड कामगारांच्या आयुष्यात 'अच्छे दिन' आणणार, ही खात्री त्याच दिवशी त्यांना जवळून ओळखणाऱ्या लोकांना पटली होती. धनंजय मुंडे यांनी आपले काका स्व. मुंडे साहेब यांना स्मरून महामंडळाची धुरा आपल्या हाती घेतली, गेली सहा वर्षे मागील सरकारने गाजावाजा केलेल्या या महामंडळाची सरकार दरबारी अधिकृत नोंद सुद्धा नाही ही बाब प्रथमदर्शनी त्यांच्या ध्यानीं आली. आणि आपल्याला यावर बरंच काम करावं लागणार आहे हे त्यांच्या लक्षात आलं. मध्यंतरी कोरोनामुळे लागलेले लॉकडाऊन, त्यातून ऊसतोड मजुरांचे केलेले 'स्पेशल लिफ्टिंग' त्यानंतर बीड जिल्ह्यातील कामगारांना महिना महिना पुरेल इतकं धान्य त्यांनी घरपोच मोफत दिलं, तेव्हा त्यांच्यातील दानत आणि जबाबदारीची जाणीव अनेकांना झाली. धनंजय मुंडे यांनी महामंडळ स्थापनेदरम्यान काहीही उणीव शिल्लक राहू नये, यासाठी तज्ञ अधिकाऱ्यांचा एक अभ्यासगट नेमला आहे, महामंडळाची नोंदणी प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. त्याचबरोबर मुंडेंनी नेमलेला अभ्यासगट ऊसतोड कामगारांसाठी एका विशिष्ट विमा योजनेवर अभ्यास करत असल्याचीही माहिती आहे. हे सगळं करत असताना प्रमुख प्रश्न होता ऊसतोड महामंडळास आर्थिक स्थैर्य देण्याचा! त्यासाठी सहकार कामगार आदी विभागांशी चर्चा करून, आपल्याला ऊस खरेदी किंवा गाळप यावर सेस (अधिभार) लावता येईल अशी कल्पना धनंजय मुंडे यांनी सुचवली होती. सामाजिक न्याय विभागाच्या कोणत्याही योजनेचा पैसा कमी होऊ नये किंवा विभागला जाऊ नये, हा शुद्ध हेतू यामागे होता. मागे एका कार्यक्रमात आरोयमंत्री राजेश भैय्या टोपे म्हणाले होते, 'आर्थिक तरतुदीच्या बाबत धनुभाऊंनी सांगायचं आणि अजितदादांनी ते मान्य करायचं;' असं सूत्र आहे, भाऊ-दादांची मैत्री तितकी प्रसिद्ध आहे आणि टोपे साहेबांनी म्हटल्याप्रमाणेच झालं!

२०२१ च्या अर्थसंकल्पात अजित दादांनी भाषण सुरू केलं, तेव्हा 'स्व. गोपीनाथराव मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी प्रत्येक कारखान्याला एकूण ऊस गाळपावर प्रतिटन १० रुपये सेस लावण्यात येईल, यातून जितका निधी संकलित होईल तितकाच निधी राज्य सरकार देईल आणि यातून महामंडळाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा खर्च चालवला जाईल' असे दादा बोलले आणि बीड जिल्ह्यातून टीव्ही वर बजेट भाषण पाहणाऱ्या अनेकांनी टाळ्या पिटल्या! राज्यात चालू कारखाने किती, ते दरवर्षी किती ऊस गाळप करतात, टनामागे दहा रुपये अधिक राज्याचे दहा असे वीस रुपयाप्रमाणे किती निधी दरवर्षी संकलित होईल, याचा हिशोब नंतर लावु, मात्र बजेट सादर झाल्यानंतर 'आज माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस आहे,

आता राज्यात जोपर्यंत ऊस पिकेल तोपर्यंत महामंडळाला निधी कमी पडणार नाही' हे जे धनुभाऊ बोलले ते बरंच काही सांगून जातं. ऊसतोड कामागारांसाठीचा विशेष कायदा, त्यांची शासन दरबारी नोंदणी, त्यांना व त्यांच्या पशूंना आरोग्य विमा, आहेत तिथे स्वस्त धान्य उपलब्धी, मुला-मुलींसाठी निवासी शाळा, नियमित आरोग्य तपासणी आदी योजनांची धनंजय मुंडे यांनी यापूर्वीच घोषणा केलेली आहे. याउपर वर्षानुवर्षे कष्ट करणाऱ्या ऊसतोड कामगारांना नवे मुंडे साहेब आणखी काय काय देतात, आणि उसतोड्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणखी काय काय करतात हे पाहणं आता औत्सुक्याचं ठरणार आहे!

# चार राज्यांमधला सत्तासंघर्ष

**पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाम या चार राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीतला राजकारणाचा पट एकसंध नाही. फक्त भाजपचं वर्चस्व असं चित्र दिसत नाही. भाजपला आघाडी करून मुसंडी मारता येऊ शकते. तसंच योग्य दृष्टिकोन विकसित केला तर काँग्रेसला आसाम आणि केरळमधे पुढे जाता येईल. पश्चिम बंगालमधे मात्र भाजप विरुद्ध तृणमूल काँग्रेस अशीच सत्तास्पर्धा आहे.**

**राजकारण**
**प्रकाश पवार**

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाम या चार राज्यांमधे विधानसभेच्या निवडणुका कोरोनाच्या दरम्यान होतायत. पुद्दूचेरी या केंद्रशासित प्रदेशातही निवडणुका आहेत. या राज्यांमधे भाजपचा विशेष प्रभाव नव्हता. पण आसाममधे भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून गेल्या निवडणुकीत पुढे आला होता. तामिळनाडूमधे जयललितांच्या नेतृत्वाखाली हिंदुत्वाचा विचार सत्ताधारी झाला होता. पश्चिम बंगालमधे भाजपला विस्तारण्याची संधी गेल्या निवडणुकीत मिळाली होती. एकमेव केरळ राज्यात भाजपला फार विस्तारण्याची संधी नव्हती. थोडक्यात, केरळ वगळता आसाम, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या तीनही राज्यांमधे भाजपने आघाडीचं राजकारण करून सत्ताधारी होण्यासाठी डावपेच आखलेत. या तीनही राज्यांमधे भाजपच्या पुढे आघाडी हाच महत्त्वाचा प्रयोग दिसतोय. तर चारही राज्यांमधे त्या राज्यांचं म्हणून स्थानिक राजकारण अत्यंत महत्त्वाचं आहे. तसंच या चारही राज्यांमधे तिथला स्थानिक दृष्टिकोन राजकारणावर प्रचंड प्रभाव टाकतो.

**सीएए एनआरसीला आदिवासींचा विरोध**

आसाममधे आसामियत हा दृष्टिकोन प्रचंड प्रभावशाली आहे. पण गेल्या निवडणुकीपासून हा दृष्टिकोन दुबळा होत चाललेलाय. गेल्या निवडणुकीत आसाममधले प्रादेशिक पक्ष भाजपच्या बाजूने झुकलेले होते. आसाम गण परिषद, बोडोलॉड पीपल्स फ्रंट, रभा जातीय ऐक्य मंच, तिवा जातीय ऐक्य मंच यांचा समावेश आहे. या निवडणुकीच्या तोंडावर मात्र एनआरसी आणि सीएए या दोन्ही कायद्यांना स्थानिक आदिवासींचा विरोध दिसतोय. स्थानिक आदिवासींमधे सगळ्यात मोठी लोकसंख्या बोडो आदिवासींची आहे. एकूण आदिवासी समाज १३ टक्के आहे. मुस्लिम समाज ३५ टक्क्यांच्या जवळपास आहे. ख्रिश्चन समाज ४ टक्क्यांच्या जवळपास आहे. हिंदू आयडेंटिटी व्यक्त करणारा समूह ६१ टक्क्यांच्या जवळपास आहे.

**बेरजेचं राजकारण काँग्रेससाठी धोक्याचं**

काँग्रेसच्या पुढे मुख्य दोन आव्हानं आहेत. एक आघाडीचं प्रारूप विकसित करण्याचं आणि दुसरं आव्हान हिंदू आणि हिंदुत्व या दोन ओळखीत अचूकपणे फरक करून हिंदू मतदारांना काँग्रेसकडे वळवणं. काँग्रेस पक्षाने ही



दृष्टी फार विकसित केलेली नाही. काँग्रेस पक्ष फक्त बेरजेचं राजकारण करत गेला तर काँग्रेसला प्रचंड मोठ्या आव्हानाला सामोरं जावं लागेल. आसामप्रमाणे पश्चिम बंगालमधे काँग्रेसच्या पुढे हिंदू आणि हिंदुत्व या दोन ओळखीत फरक करण्याचं मोठं आव्हान आहे. काँग्रेसने युती कोणाशी करावी हासुद्धा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. पश्चिम बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेस आजही ताकद बाळगून आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमधल्या सत्तेची स्पर्धा सरळ सरळ तृणमूल काँग्रेस विरोधी भाजप अशीच होणार आहे. पश्चिम बंगालमधल्या सत्तेच्या स्पर्धेत काँग्रेस आणि डावे पक्ष तिसऱ्या चौथ्या क्रमांकावर आहेत. म्हणजेच आक्रमकता-प्रदेशवाद आणि आक्रमकता-हिंदुत्व या चौकटीत मुख्य सत्ता स्पर्धा आहे. या दोन्ही चौकटींना बाजूला ठेवून तिसरी चौकट प्रत्यक्षात आणायची क्षमता मात्र पश्चिम बंगालमधल्या राजकारणात सध्या दिसत नाही.

**तामिळनाडूत सत्तास्पर्धेच्या बाहेर काँग्रेस**

तामिळनाडूचं राजकारण सातत्याने दोन गटांत विभागलेलं राहिलंय. त्या दोन्ही गटांचे मुख्य नेते आज काळाच्या पडद्याआड गेलेत. पण नवीन नेत्यांचा उदय झालेला आहे. एम स्टॅलिन यांचा द्रमुक आणि पलानीस्वामी यांचा अण्णाद्रमुक असे दोन पक्ष एकमेकांच्या विरोधात विधानसभा निवडणुकीत आहेत.

काँग्रेस पक्ष स्टॅलिन यांच्या द्रमुकबरोबर जुळवून घेतोय. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने ४१ जागा लढवून फक्त आठ जागा जिंकल्या होत्या. यामुळे सध्या जागावाटपात एम स्टॅलिन यांनी काँग्रेसला फक्त २४ जागा देण्याचा आग्रह धरलेला आहे. काँग्रेस पक्षाने या राज्यात आपली कुवत घटवलेली दिसते. म्हणजेच काँग्रेस पक्ष या राज्यात सत्ता स्पर्धेच्या बाहेर आहे.

**जयललितांच्या हिंदुत्वाचा फायदा भाजपला?**

तामिळनाडूमध्ये हिंदुत्वाची मुख्य ताकद अण्णा द्रमुक या पक्षात आहे. जयललितांच्या नंतर या पक्षात वेगवेगळे गट उदयाला आले. शशिकला यांनी अम्मा मक्कल मुन्नेत्र कझगम या पक्षाची स्थापना केली. तर अण्णाद्रमुकवर पालानीस्वामी आणि पन्नेरसेल्वम यांचा दावा आहे. जयललिता यांच्या हिंदुत्वातून काही ताकद मिळवण्याचा प्रयत्न भाजपने केलाय.

# अर्थसंकल्पात बीडचा बोलबाला

## पालकमंत्री धनंजय मुंडेच्या रूपाने जिल्ह्याच्या विकासाला गती



▶ प्रतिनिधी

मुंबई : नव्या अर्थसंकल्पाच्या रूपाने बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्ह्याच्या विकासकामांना गती दिली आहे. बीड शहरातील व्हीव्हीआयपी विश्रामगृहाच्या नुतनीकरणाच्या ७.२६ कोटी रुपयांच्या आराखड्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच आष्टी तालुका न्यायालयाच्या इमारत बांधकामाच्या ७.१२ कोटी रुपयांच्या आराखड्यासही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२६ जानेवारी २०२१ रोजी जिल्हा पोलिस मुख्यालयाच्या मैदानात बीड जिल्हा वासियांना संबोधित करताना धनंजय मुंडे यांनी कोविड विषयक नियम व आर्थिक निर्बंध जसजसे कमी होतील तसतसे जिल्ह्यातील रखडलेले विकासकामे हाती घेऊन पूर्णत्वास नेण्यात येतील अशा शब्द जिल्हा वासियांना दिला होता. त्यानुसार अर्थसंकल्पाचे सूप वाजताच धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील रखडलेले प्रकल्प पूर्णत्वास नेणे व पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला आहे. बीड आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांनी बीड शहरातल्या शासकीय विश्रामगृहाच्या नूतनीकरण संदर्भात मागणी केली होती. तर आष्टी-पाटोदा-शिरूरचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी आष्टी येथील न्यायालयास नवीन इमारत बांधण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने बीड शहरातील व्हीव्हीआयपी विश्रामगृहाच्या नूतनीकरण कामाच्या ७ कोटी २६ लाख ८८ हजार रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे तसेच आष्टी तालुका न्यायालयाच्या नवीन इमारत बांधकामाच्या ७ कोटी १२ लाख ७७ हजार रुपयांच्या आराखड्यासही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. लवकरच या दोनही कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येणार आहे.

### लोकप्रतिनिधींनी घेतली कोरोना लस







बीड : राज्याचे सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी कोरोना लस घेतले. माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके आणि बीड जिल्हा परिषदेच्या सदस्य मंगलाताई सोळंके कोरोना लस घेताना.

# सर्व्हे नंबर ३८० ची फेरमोजणी

## ईटीएस मशीनद्वारे मोजणीला सुरवात

▶ प्रतिनिधी



माजलगाव : शहरातील मुख्य ठिकाणी असलेल्या सर्व्हे नंबर ३८० मधील शासनाच्या गायरान जमिनीवर मोठ्याप्रमाणात अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण निष्कशित करण्यात यावे, यासाठी पत्रकार सुभाष नाकलगावकर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. याबाबत तहसील कार्यालयात सुनावणी सुरु आहे. तहसीलदार यांच्या आदेशाने वरील सर्व्हे नंबरची सोमवारपासून फेरमोजणी होत असल्याने अतिक्रमणधारकात चांगलीच खळबळ उडाली आहे.

शहरातील सर्व्हे नंबर ३८० मधील एकूण ३३ हेक्टर जमिनीपैकी ११.७८ हेक्टर शासकीय गायरान जमीन आहे. ही जागा शहराच्या मोक्याच्या ठिकाणी असल्याने मागील कित्येक वर्षापासून अनेक नागरिकांनी या जागेत अतिक्रमण करून मोठमोठ्या ईमारती उभा केल्या आहेत. शासकीय जमिनीतील अतिक्रमणे पाडण्यासाठी पत्रकार संघासह विविध संघटनेने आंदोलने करूनही महसूल विभागाकडून काहीच कारवाई झाली नाही. यामुळे पत्रकार सुभाष नाकलगावकर यांनी अतिक्रमण निष्काशित करण्यासाठी वर्षभरापूर्वी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. न्यायालयाने अतिक्रमण धारकांची सुनावणी घेण्याचे आदेश तहसीलदारांना दिले. सुनावणीदरम्यान सर्व्हे नंबर ३८० च्या आतापर्यत झालेल्या अनेक मोजणीपैकी काही रेकॉर्ड उपलब्ध नाही. यामुळे सदर सर्व्हे नंबरची फेरमोजणी करण्याचे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी भूमिअभिलेख कार्यालयाला दिले. यानुसार सर्व्हे नंबर ३८० ची फेरमोजणी सोमवारपासून होत असून भूमिअभिलेखचे उपाधीक्षक बी.एम. भांबड यांनी बाजूचे सर्व्हे नंबर ३६८, ३६९, ३८२, ३८५, ३८७, ३७९ मधील शेकडो नागरिकांना नोटीस पाठवल्या आहेत. सदरील मोजणीचे पथक प्रमुख एस.ए.सोनवणे, व्ही.बी.दोडके, एस.बी.पुजारी, एम.व्ही.दहिवाळ हे असून ही मोजणी एटीएस मशीनद्वारे करण्यात येणार आहे.

# व्यायामशाळा उभारणीसाठी नगरपालिकेने जागा द्यावी

## युवासेनेचे तालुकाप्रमुख बाळासाहेब मेंडके यांची मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील सर्व्हे नंबर ३८५ मधील शिल्लक असलेली जागा व्यायामशाळेसाठी संपादित करून देण्यात यावी अशी मागणी युवासेनेचे माजलगाव तालुकाप्रमुख बाळासाहेब मेंडके यांनी एका निवेदनाद्वारे नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात बाळासाहेब मेंडके यांनी म्हटले आहे की, माजलगाव शहराच्या हद्दीत सर्व्हे नंबर ३८५ मध्ये शिल्लक जागा आहे. या जागेचा सदुपयोग करण्यासाठी शासनाने व्यायामशाळेसाठी सदर जागा संपादित करून उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून या ठिकाणी तरूण युवकांना व्यायामासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध होईल. नगरपालिका प्रशासनाने लक्ष घालून सदर जागा उपलब्ध करून दिली तर साहेब प्रतिष्ठानच्या वतीने व्यायामाचे साहित्य मोफत दिले जाईल, तरी या मागणीकडे नगरपालिकेने सहानुभूतीपूर्वक विचार करून जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी बाळासाहेब मेंडके यांनी लावून धरली आहे.

### व्यायामशाळेस बाळासाहेब ठाकरे यांचे नाव हवे

माजलगाव शहर आणि परिसरात सर्व साधन युक्त व्यायामशाळेची गरज आहे. नगरपालिकेने शिल्लक जागा व्यायामशाळेसाठी प्राधान्यक्रमाने द्यावी आणि या व्यायामशाळेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. याबाबत तातडीने कार्यवाही झाल्यास शहरातील युवा वर्गाच्या दृष्टीने तो निर्णय दिलासादायक ठरणार आहे.

# माजलगाव धरणाचे 'लोकनेते सुंदरराव सोळंके जलाशय' नामकरण करा

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्याचे भाग्यविधाते माजी उपमुख्यमंत्री दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या दूरदृष्टीतुन उभा राहिलेल्या माजलगाव धरण प्रकल्पाच्या उभारणीतील त्यांच्या योगदानाचे स्मरण पुढील अनेक पिढ्यांना राहावे आणि लोकनेते सुंदरराव सोळंके यांच्या प्रति कृतज्ञतेच्या भावनेतून माजलगाव धरणाचे नामकरण 'लोकनेते सुंदरराव सोळंके जलाशय' करण्यात यावे, अशी मागणी आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे सन्मित्र मित्र मंडळाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.

लोकनेते दिवंगत सुंदरराव सोळंकेयांच्या भगीरथ प्रयत्नातून माजलगाव धरण प्रकल्प उभा राहिला. हजारो एकर जमीन ओलिताखाली आली असून शेतकऱ्यांचे जीवनमानही उंचावले आहे. तालुका सुजलाम-सुफलाम करण्यात माजलगाव धरणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या नामकरण सोबतच धरण परिसराचे सुशोभिकरण करून लोकनेते सुंदरराव सोळंके यांचे स्मृती स्मारक आणि उद्यानाची निर्मिती करण्यात यावी, जेणे करून माजलगाव शहराच्या वैभवात भर पडेल आणि एक पर्यटनस्थळ म्हणून धरण परिसराचा विकास होईल, अशीही मागणी आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली असून यावेळी सन्मित्र मित्र मंडळाचे अध्यक्ष हिमांशू देशमुख, सचिव चिंतेश जोशी, कृष्णा थोरात, सुयोग पोतदार, अमोल रत्नपारखी आदींची उपस्थिती होती.

# मोगरा तांडा दुर्घटनाग्रस्तांना सभापती संभाजी शेजुळ यांनी केली आर्थिक मदत

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील मोगरा शिवाजी तांड्यावर झालेल्या गॅस सिलेंडर स्फोटातील दुर्घटनाग्रस्तांना माजलगाव बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांनी सदर कुटुंबीयांना आर्थिक मदत करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. मदत देवून या कुटुंबियांना आधार देण्याचे काम केले.

गेल्या २५ फेब्रुवारी रोजी मोगरा गावाजवळील शिवाजी तांड्यावर एका घरामध्ये सिलेंडरचा स्फोट झाला. यामध्ये लाखो रुपयांचे मोठे नुकसान झाले. तसेच त्या घराच्या शेजारील दोन घरामध्येही आर्थिक व संसार उपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. यामुळे तीन कुटुंब उघड्यावर पडले होते. यांना काही दिलासा मिळावा म्हणून माजलगाव बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यानी कुटुंबीयांना आर्थिक मदत केली. या दुर्घटनाग्रस्तांमध्ये अशोक रामा पवार, प्रकाश रामा पवार, विकास पवार या कुटुंबियांचा समावेश आहे. या मदतीमुळे दुर्घटनाग्रस्त कुटुंबाने समाधान व्यक्त केले. शासनाने लवकरात लवकर या कुटुंबांना भरिव मदत करावी अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.



# आझादनगरमधील विकासकामांसाठी नगरपरिषदेसमोर नागरिकांचे उपोषण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील आझादनगर येथील भागातील विविध विकासकामात दोन्ही नगरसेवक खोडा घालत आहेत. या प्रभागातील प्रलंबित कामे तत्काळ सुरू करण्यात यावित, यासाठी या भागातील नागरिकांनी नगरपरिषदेसमोर उपोषण केले.

शहरातील आझाद नगर भागातील विविध विकासकामांना मंजुरी असतांना या प्रभागातील दोन्ही नगरसेवक यात खोडा घालत आहेत. सध्या धारुर रोड ते बायपास रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. शाळकरी मुले व नागरिकांना ये-जा करण्यास मोठी अडचण निर्माण होत आहे. हे रस्ते तत्काळ करण्यात यावेत, आझादनगरमध्ये तब्बल बारा-बारा दिवस पाणीपुरवठा केला जात नाही, तो तात्काळ करण्यात यावा, डी.पी.रोड व त्यामार्गावरील पाईपलाईन तत्काळ करावी या व इतर मागण्यांसाठी सोमवारी नगर परिषद कार्यालयासमोर आझादनगर येथील शेख फेरोज यांच्यासह प्रभाग १२ तील नागरिकांनी उपोषण केले. दखल न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# वसंतराव नाईक यांचा पुतळा दुरुस्त करा : उजगरे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील माजलगाव बाजार समितीच्या परिसरामध्ये हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या अर्धाकृती पुतळा उभारण्यात आलेला असून सद्य परिस्थितीमध्ये पुतळ्याची दुरावस्था झालेली दिसून येते आहे.

वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचा हा परिसर अस्वच्छ असल्याकारणाने पुतळ्याचा एक डोळा हा खराब अवस्थेत दिसून येत आहे. त्यामुळे अस्वच्छ असलेल्या अवस्थेत वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यासारखेच दिसत आहे. या पुतळा परिसरात सुशोभिकरण व्हावं, अशी मागणी लढा मानवमुक्तीच्या वतीने अध्यक्ष सचिन उजगरे यांनी केली आहे.

तसेच पुतळयाच्या बाजूला उभारण्यात आलेले झगमग दिवे देखील बंद अवस्थेत असून त्याबरोबरच या पुतळ्याची रंगरंगोटी करून सुशोभीकरण करावे, असे निवेदन लढा मानवमुक्तीच्या वतीने सचिन उजगरे, सिद्धार्थ पौळ, शिवाजी ससाने, अजय शेरकर, पांडुरंग वैद्य यांनी बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांना देण्यात आले.

# जगन्नाथ करवा यांचे निधन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : जगन्नाथ गणेशलाल करवा (वय ८६) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले ,चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विजय व रामेश्वर यांचे वडील तर पत्रकार पुरूषोत्तम करवा यांचे ते चुलते होत. करवा परिवाराच्या दुःखात वर्तमान परिवार सहभागी आहे.

# 'वारकरी मंडळा'च्या प्रचारप्रमुखपदी भगीरथ तोडकरी





माजलगाव : वारकरी प्रबोधन सेवा मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.रमेश महाराज वाघ यांच्या हस्ते माजलगाव तालुका प्रचार प्रमुखपदाचे नियुक्तीपत्र स्विकारताना वर्तमान माध्यम समुहाचे संपादक भगीरथ तोडकरी, याप्रसंगी जिल्हाध्यक्ष ह.भ.प.कालिदास महाराज नाईकनवरे, जिल्हा उपाध्यक्ष ह.भ.प.महारूद्र महाराज पवार, ज्येष्ठ पत्रकार तुकाराम येवले, बालासाहेब फपाळ पाटील.

# डॉ.निलम गोऱ्हे यांचे सामाजिक दायित्व

## त्या वृध्द महिलेला २५ हजारांची मदत

प्रतिनिधी

माजलगाव : शिवसेना नेत्या डॉ. निलम गोऱ्हे नेहमीच सर्वसामान्यांच्या



मदतीला धावून जात असतात. माजलगाव येथील स्वातंत्र्यसैनिक शंकरराव मुळे यांच्या विधवा वयोवृद्ध पत्नी पार्वतीबाई मुळे यांच्या अत्यंत हलाखीच्या स्थितीबाबतची माहिति मिळाल्यानंतर डॉ.निलम गोऱ्हे अस्वस्थ झाल्या. त्यांनी या आजीबाईंना मदतीसाठी हात पुढे करीत शिवसेना तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांच्या मार्फत पार्वतीबाई मुळे यांच्या घरी त्यांना पाठवून २५ हजार रूपयांची रोख मदत दिली.

दोन वर्षापूर्वी पार्वतीबाई यांची दोन तरूण मुले मृत्यूमुखी पडली त्यानंतर त्यांच्या कुटुंबात ८८ वर्षाच्या पार्वतीबाई आणि ६० वर्षाची त्यांची विधवा मुलगी मित्रवृंदा या दोघीच आहेत. काळाने सातत्याने आघात केलेल्या पार्वतीबाई आज एकाकी जीवन जगत आहेत. स्वातंत्र्य सैनिकांच्या या कुटुंबाला आर्थिक मदती सोबतच मानसिक आधाराची खूपच गरज होती. या बाबतची माहिती मिळाल्यानंतर



शिवसेना नेत्या डॉ.निलम गोऱ्हे यांनी स्थानिक शिवसैनिकांना सूचना करून २५ हजार रुपये मदत तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांच्या मार्फत पार्वतीबाईंकडे सुपूर्द केली. या वेळी मुंजाबा जाधव, अमोल देशमुख, राम कुलकर्णी, माऊली गायके, सुभाष नाकलगावकर, हरिश यादव, पांडुरंग उगले उपस्थित होते.



# वाढत्या गुन्हेगारीला तिसऱ्या डोळ्याचा वचक

## पतसंस्था, मल्टीस्टेट फेडरेशनने घेतला पुढाकार

प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील वाढती गुन्हेगारी, मोटारसायकल चोरीच्या घटनेला आळा घालण्यासाठी शहरातील मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू झाले आहे. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालून शहरवासीयांना दिलासा मिळावा, यासाठी पतसंस्था, मल्टिस्टेट संघटनेने पुढाकार घेऊन यासाठी लागणारा निधी जमा केला आहे. शनिवारपासून शहरातील मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरु झाले आहे.

शहरातील चोऱ्या, छेडछाडीचे, भांडण आदीसह गुन्हेगारी घटनांसह इतर बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी माजलगाव शहर सीसीटीव्हीच्या निगराणीत येणार आहे. या कार्यासाठी सामाजिक बांधिलकीतून येथील सहकारी पतसंस्था, मल्टिस्टेट फेडरेशनने पुढाकार घेतला आहे. शहर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांनी फेडरेशनचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांच्यासमोर हा प्रस्ताव मांडला होता. त्या अनुषंगाने पतसंस्था, मल्टिस्टेट पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय मान्य करण्यात आला. त्यानुसार शहरातील महत्त्वाची ठिकाणे असणारी छत्रपती संभाजी महाराज चौक, रंगोली कॉर्नर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नरवडे कॉम्प्लेक्स, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, करवा पेट्रोल पंप, आझाद चौक, हनुमान चौक, परभणी टी पॉइंट, सिद्धेश्वर शाळा–महाविद्यालय, सुंदरराव सोळंके महाविद्यालया समोरील परिसर आदी ४६ महत्वाच्या ठिकाणी उच्च दर्जाच्या कॅमेराची नजर राहणार आहे. ही सर्व कॅमेरे चौकाचौकात बसविण्याचे काम सरू झाले असून या सर्व कॅमेरांचे नियंत्रण शहर पोलिस ठाण्यात राहणार असल्याने गुन्हेगारीला मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.

# पोलिसांकडून ४५० ब्रास वाळूसाठा जप्त

प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव उपविभागांतर्गत येत असलेल्या पोहनेर येथील गोदापात्रात अनधिकृतरीत्या साठवून ठेवण्यात आलेला ४५० ब्रास वाळुसाठा पोलिसांनी जप्त केला. ही कार्यवाही मंगळवारी केली आहे.

माजलगाव तालुक्यातील गंगामसला, बोरगाव, मोगरा, सुरुमगाव या गोदाकाठच्या ठिकाणी असणाऱ्या गावांमधून सर्रास वाळू तस्करी होत आहे. हा सर्व प्रकार राजरोसपणे होत असताना प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याची ओरड नेहमीच होते. तालुक्यातून होणाऱ्या वाळू तस्करीवर नियंत्रण बसत नसले, तरी परळी तालुक्यातील सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोहनेरच्या गोदापात्रात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आलेल्या वाळू साठ्यावर कार्यवाही केली आहे. यावेळी पोलिसांनी ४५० ब्रास बेवारस वाळू साठा व एक केनी जप्त केली. दरम्यान, परळी तहसीलदार, मंडळ अधिकारी यांनी या वाळू साठ्याचा पंचनामा केला आहे. यावेळी या कार्यवाहीत उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक डोंग आदींच्या पथकाने कारवाई केली.

## सभापती अशोक डक यांची तत्परता

# आंबा उत्पादकांना मिळाली थकबाकी

प्रतिनिधी

मुंबई : येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासन व संचालक मंडळाने शेतकऱ्यांची थकित रक्कम परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. फळ मार्केटमध्ये २०१९ पासून हापूस आंब्याचे तीन शेतकऱ्यांचे ११ लाख ९० हजार रुपये थकविले होते. सभापती अशोक डक व संचालक मंडळाने व्यापाऱ्याच्या गाड्या जप्त करण्यासाठी आदेश दिल्याने त्या व्यापाऱ्याने शेतकऱ्यांना पैसे दिले आहेत.



मुंबई एपीएमसी फळ मार्केटमध्ये आंबा व्यापाऱ्याकडून फसवणूक करण्यात आलेल्या आंबा शेतकऱ्यांना त्यांचे पैसे एमपीएमसी प्रशासनाकडून सुपूर्द करण्यात आले.

तीन वर्षापूर्वी रत्नागिरी, लांजा येथील रमेश देसाई, अबिद खाजी आणि बिलाल इसफ या शेतकऱ्यांनी जवळपास २४०० पेटी फळ मार्केटमध्ये असलेल्या आंबा व्यापारी दत्तात्रय हरिभाऊ कंपनी एफ १८० यांना पाठवला होता. व्यापाऱ्याने आंबा विक्री करुन त्याची पट्टी देखील या शेतकऱ्यांना पाठवली होती. मात्र गेली अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांचे पैसे दिले जात नव्हते. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी एपीएमसी प्रशासनाला फसवणूक झाल्याचा अर्ज केला होता.

यावर तिन्ही शेतकऱ्यांना जवळपास ११ लाख ९० हजार रुपयांचा धनादेश एपीएमसी प्रशासनाकडून सुपुर्द करण्यात आला. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी सभापती अशोक डक यांचे आभार मानले.

# श्री मंगलनाथ मल्टिस्टेटमध्ये महिला दिन उत्साहात

प्रतिनिधी

माजलगाव : येथील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य श्री मंगलनाथ मल्टिस्टेट येथे महिला सक्षम विभागाद्वारे महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक महिला दिनानिमित्त राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले. संस्थेच्या संचालिका सौ.जयदेवी रामेश्वर कानडे यांनी उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देताना संस्थेद्वारे ३००० महिलांना महिला सक्षम विभागाद्वारे प्रत्यक्षरित्या रोजगार मिळण्यासाठी पतपुरवठा केला असल्याचे सांगून, या पतपुरवठाद्वारे महिलांनी आपला व आपल्या कुटुंबाचा विकास करावा असे सांगितले तसेच, महिला सक्षम विभागाद्वारे ज्या महिलांनी आपले व्यवसाय यशस्वीरीत्या उभारले त्यांचा सत्कार केला आणि आपली



कौटुंबिक जबाबदारी सांभाळत कार्यालयीन कामकाज करणाऱ्या महिला कर्मचारी यांचा देखील यावेळी उपस्थित कर्मचारी यांनी सत्कार करून महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या प्रा.सौ.उषा रत्नपारखी, सौ.विजया देशमुख, सौ.टाले, सक्षम विभाग प्रमुख बाबुराव खोदानपुरे, शाखा व्यवस्थापक विकास पाटील हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर चाळक, मधुकर गायकवाड, गणेश कदम, विक्रम गरुड, गणेश वैगुंडे यांनी परिश्रम घेतले.

## मधुकर रुद्रवार यांचे दु:खद निधन

प्रतिनिधी

माजलगाव : येथील सोन्या–



चांदीचे सुप्रसिद्ध जेष्ठ व्यापारी मधुकरराव गोविंदराव रुद्रवार यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मधुकर रुद्रवार यांना माजलगाव तालुका सराफ असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रूद्रवार परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान परिवार सहभागी आहे.

# माजलगावकरांची पाण्यासाठी वणवण

## नगरसेवकांचे दुर्लक्ष : पाईपलाईनला लिकेज; नागरिक वैतागले

प्रतिनिधी

माजलगाव : नगर परिषद स्थापन झाल्यापासून इतिहासात कधी निधी आला नाही, तितका निधी माजलगाव नगर परिषदेला प्राप्त झाला या निधीतून अक्षरशः माजलगाव मेट्रो सिटी देखील झाली असती परंतु असंवेदनशील नगराध्यक्ष, नगरसेवक आणि नगर परिषद प्रशासन यांच्या बकाल धोरणाने माजलगावकरांचे अक्षरशः हाल होत असून शहरात पाणी पुरवठा देखील योग्य प्रकारे होत नसल्याने उन्हाळ्याच्या सुरवातीलाच नागरिकांच्या दारात टॅन्करच्या खेपा दिसून येत आहेत तर अनेक प्रभागात पाईप लाईन चे लिकेज असताना त्यावरच नवीन रस्ते तयार करण्याचे काम न.प.कडून होत असल्याने केवळ आलेले पैसे हडप करण्याचा डाव असल्याचा प्रकार जनता अनुभवत आहे.

जवळजवळ ५० कोटी रुपयांचा निधी माजलगाव नगर परिषद ला मिळाला आहे गेली तीन साडेतीन वर्ष हा निधी उपलब्ध असून त्याचा विनियोग झाला नाही केवळ आरोपांच्या फैरीत नगर परिषद राज्यभर गाजवून नव्याने राष्ट्रवादी ने आपली सत्ता नगर परिषद वर काबीज केली मोठ्या अपेक्षेने शहराचा काही तरी विकास होईल हि बाब समोर धरत बदल देखील नागरिकांनी स्वीकारला पण आता मात्र परिस्थिती पहिले होती त्यापेक्षाही हि बकाल झाली आहे.जागोजागी कचऱ्याचे ढिगारे,तुंबलेल्या नाल्या, मोकाट जनावरे, लोंबकळणाऱ्या विजेच्या तारा, अस्वछ रस्ते, रस्ता कमी आणि खड्डे जास्त अशी स्थिती शहरात असताना मात्र नगराध्यक्ष आणि नगरसेवक 'तेरी भी चूप मेरी भी चूप च्या भूमिकेत वावरताना दिसून येत आहेत.कोट्यवधी रुपयांचा चुराडा होत असताना केवळ कामाचा फार्स म्हणून थातूर मातूर स्वरूपात कामे करण्याचा सपाटा सुरु झाला असून होत असलेल्या कामास न दर्जा न टिकाऊपण शहराची अवस्था अत्यंत बकाल झाली असून नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे देखील अवघड झाले आहे.

### पाणी पुरवठा विस्कळीत

शहरात अनेक प्रभाग असे आहेत की ते नगर परिषद ला वार्षिक नळपट्टी, घरपट्टी न चुकता आदा करतात परंतु नगर परिषदच्या ढिसाळ कारभाराने संपूर्ण माजलगावकर वैतागून गेले असून धरण उशाला असून देखील घसा कोरडा राहण्याची पाळी उभा राहिली आहे. संपूर्ण पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. जागोजागी लिकेज झाले असून मुख्य रस्त्यावरून पाण्याचे पाट वाहत असल्याचे चित्र गेल्या वर्षापासून शहरात असून यावर मात्र न.प. ही दुखणं म्हशीला अन इलाज हल्याचा असा खेळ मांडत असून केवळ निधीचा अपव्यय सद्य स्थितीत सुरु असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

### खाली लिकेज वर रस्ता

शहरात अनेक ठिकाणी नवीन सिमेंट रस्ते करण्याचा फार्स सुरु आहे. त्या होत असलेल्या कामाची गुणवत्ता मात्र राम भरोसे असून त्यातही कळस म्हणजे रस्त्याच्या खाली लिकेज कायम आणि त्यावरून नवीन रास्ता करण्याचा सपाटा सुरु झाला. असून नेमकं हा आलेला निधी खर्च करायचा आहे की खरोखरच शहर बकाल ठेवायचं आहे हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

# मध्यप्रदेशातील २९ कामगारांची होणार घरवापसी

प्रतिनिधी

माजलगाव : मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील २९ मजूर महाराष्ट्रात ऊसतोडणी कामासाठी आले व दलालांमुळे माजलगावात अडकून पडले होते. याबाबत सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी तात्काळ दखल घेत समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ.सचिन मडावी व माजलगाव पोलिसांना या मजुरांची सुटका करणेबाबत सूचना दिल्या.

या मजुरांची आता सुटका होत असून मंगळवारी त्यांची घरवापसी होणार आहे. छिंदवाडा येथील दलालांने बीड जिल्ह्यातील मुकादमाकडून पैसे घेऊन मजूर पुरवण्याची बोली केली व उचल घेतली होती. त्या बदल्यात २९ मजूर मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील २९ मजूरांना एका टेम्पोमध्ये टाकून महाराष्ट्र सीमेतील धारणी या गावी आणून महाराष्ट्रातील मुकादमाच्या स्वाधीन केले होते. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तीन कारखान्यावर या मजुरांनी ऊसतोडणीचे काम केले. शेवटी हे मजुर सादोळा ता.माजलगाव येथे ऊसतोडणी साठी आले. त्यांना मजूरीचे पूर्ण पैसे देवून त्यांना गावी परत पाठवण्याचे ठरलेले असताना मुकादमाने त्यांना पोहोचविले



नाही. त्यामुळे हे मजूर गेल्या तीन दिवसांपासून माजलगाव मध्ये अडकून पडले होते.

# माजलगावात मोटरसायकल चोरट्यांची टोळी सक्रिय

प्रतिनिधी

माजलगाव : शहरात मागील महिनाभरात जवळपास एक दिवसांआड दुचाकी मोटरसायकल चोऱ्या भरदिवसा सुरूच असून शनिवारी तहसील परिसरातील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी प्रभाकर कठाळू पोटभरे यांची हिरो स्प्लेन्डर प्लस एम एच ४४–एल ७५०१ ही गाडी दुपारी एक ते दीडच्या सुमारास पार्कींगमधून हँण्डललॉक तोडून तहसील आवारातून लंपास करण्यात आली. सातत्याने होणाऱ्या या घटनांमुळे शहरात पोलीस यंत्रणा असून नसल्यासारखी झाली आहे. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी त्वरित दखल घ्यावी अशी मागणी होत आहे. दरम्यान वाहने चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने पोलीस हतबल झाले आहेत.

शहरात मागील सहा महिन्यांपासून रहदारीच्या ठिकाणी दररोज भरदिवसा रोज एक मोटरसायकल तर रात्री घरफोडी असे प्रकार सातत्याने सुरू असून येथील पोलीस यंत्रणा ढेपाळली असल्याने गुन्हेगारांवर त्यांचा वचक राहिला नाही त्यामुळे दररोज अशा घटना घडत आहेत, यापूर्वी शनिवार दि.२० फेब्रुवारी रोजी नविन बसस्थानकासमोरून पत्रकार सुधीर नागापुरे यांची होंडा शाईन एम एच २३ एक्यु १६६९ ही मोटरसायकल सायंकाळी सातच्या दरम्यान लंपास करण्यात आली होती,त्याचा अद्यापही कुठलाही शोध पोलिसांनी घेतलेला नाही किंवा तपास केलेला नाही. दिवसात दररोज एक गाडी चोरीस जात असताना पोलीस तपास शून्य असल्याने याची जनतेमध्ये भीती निर्माण झाली आहे.

माजलगाव शहरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, नवीन बसस्थानक, सुंदरराव सोळंके महाविद्यालय परिसर, छत्रपती संभाजी महाराज चौक, सन्मित्र कॉलनी, विवेकानंदनगर, विविध बँका, नागरी वसाहती आदी ठिकाणी दररोज एक मोटरसायकल चोरी होण्याची घटना सातत्याने घडत आहे त्यामुळे जनतेच्या मनात भीती निर्माण झालेली आहे ती दूर करण्यात पोलीस अपयशी ठरले आहेत.ज्यांच्या मोटरसायकल चोरी गेल्या त्या पुन्हा मिळतच नाहीत त्यामुळे बरेच नागरिक तक्रार देण्यास धजावत नाहीत म्हणूनच चोरट्यांचे फावत असून त्यांना पोलीस यंत्रणेचा कुठलाही धाक न राहिल्याने दररोज अशा घटनामध्ये वाढ होत आहे.

### तपास मोहीम शून्य

चोरीच्या सतत घटना घडत असतील तर अशा गुन्हेगारांना पकडण्यासाठी पोलीस संशयित ठिकाणी साध्या वेशात काही दिवस पाळत ठेवतात व अशा सापळ्यात गुन्हेगार एकदा तरी सापडतो असे आपण नेहमी वाचतो किंवा टीव्ही वर पाहतो.मात्र या शहरात मोटरसायकल चोरीच्या सतत घटना घडत असताना येथील पोलिस मात्र 'आळी मिळी चूप' अशी भूमिका घेऊन गप्प बसले आहेत, त्यामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे.

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**